# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ९५/२०१९** | **दिनांक २६/११/२०१९** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविद्या विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविद्या विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविद्या विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २०/११/२०१९ ते २६/११/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २७/११/२०१९ सकाळी ८:३० पासून ०१/१२/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०/११ | २१/११ | २२/११ | २३/११ | २४/११ | २५/११ | २६/११ | | २७/११ | २८/११ | २९/११ | ३०/११ | ०१/१२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३८.२ | ३८.३ | ३७.२ | ३६.६ | ३७.३ | ३६.६ | - | कमाल तापमान (अं.से) | ३२ | ३२ | ३३ | ३३ | ३३ |
| २२.५ | २२.५ | २३.७ | २३.६ | २२.९ | २२.४ | - | किमान तापमान (अं.से) | २२ | २२ | २२ | २३ | २३ |
| - | - | - | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | १ | १ | ४ | ६ | ५ |
| १०० | १०० | ९१ | ९९ | ९९ | १०० | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ६५ | ६४ | ५९ | ६६ | ६७ |
| ७७ | ७४ | ७३ | ६३ | ५७ | ५८ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ३९ | ३८ | ३६ | ४२ | ४३ |
| ००३ | ००२ | ००२ | ००३ | ००३ | ००२ | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ७ | ८ | ८ | ७ | ७ |
| इ. | इ. | इ.उ. | इ. | इ. | इ. | - | वाऱ्याची दिशा | पु. | पु. | पु. | पु. | इ.पु. |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक २७ नोव्हेंबर ते १ डिसेंबर, २०१९ दरम्यान कमाल तापमानात वाढ संभवत असून दिनांक २९ नोव्हेंबर ते १ डिसेंबर, २०१९ दरम्यान आकाश अंशतः मेघाच्छादित राहील. दिनांक २९ नोव्हेंबर ते १ डिसेंबर, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा कमी राहील. सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार ठाणे जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक चांगल्या स्वरूपाचा असून प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | रोपवाटिका | • रब्बी उन्हाळी भात रोपवाटीकेस नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| आंबा | पालवी | • आंब्याच्या नवीन येणाऱ्या पालवीवर तुडतुडे, शेंडे पोखरणारी आणि मिजमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पालवीचे किडींपासून संरक्षण करण्यासाठी लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पाऊसाची उघडीप पाहून फवारणी करावी. |
| वांगी | रोप अवस्था | • वांगी पिकाची रोपे लागवडीयोग्य झाली असल्यास पुर्नलागवड करावी. पाने लहान राहणे या रोगापासून संरक्षण करण्याकरीता पुर्नलागवड करतेवेळी रोपे डायमिथोएट १ मि. ली. आणि अक्रोमायसिन ०.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्याच्या द्रावणात ५ मिनिटे बुडवून लागवड करावी. लागवड सरीवरंब्यावर ६० x ६० से.मी. अंतरावर करावी. लागवडीच्या वेळेस प्रती एकरी ८ टन शेणखत, ४३ किलो युरिया, १२५ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ३३ किलो म्युरेट ऑफ पोटश खताची मात्रा द्यावी. लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे. |
| मिरची | रोप अवस्था | • मिरची पिकाची रोपे लागवडीयोग्य झाली असल्यास पुर्नलागवड करावी. लागवड सरीवरंब्यावर ६० x ६० से.मी. अंतरावर करावी. लागवडीच्या वेळेस प्रती एकरी ६ टन शेणखत, ६५ किलो युरिया, १८८ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ३३ किलो म्युरेट ऑफ पोटश खताची मात्रा द्यावी. लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे. |
| अस्टर | रोपवाटिका | • अस्टर फुलपिकाच्या रोपवाटिकेस नियमित पाणी द्यावे. |
| झेंडू | रोपवाटिका | • झेंडू फुलपिकाच्या रोपवाटिकेस नियमित पाणी द्यावे. |
| दुभती जनावरे | - | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठ्याची व्यवस्था करावी.<br>• जनावरांना पायलाग रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशु वैद्यकिय अधिकारी सल्ल्याने सर्व जनावरांना लसीकरण करून घ्यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**